(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

दि.१९ / ९ /2024

(गोषवारा)

प्रकरण क्र.१७४:- मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांना मुदतवाढ देणेबाबत.

महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू करण्याचे काम सुरु केले असून आतापर्यंत 565 कर्मचाऱ्यांचे सभासद नोंदणीसाठी कादगपत्रे/दस्तऐवज तपासणे, फॉर्म ऑफलाईन भरणे व त्यापैकी 530 कर्मचाऱ्यांना ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी डाटा संगणकामध्ये भरणे, पी.एफ.आर.डी.ए, दिल्ली यांची मान्यता घेणे, प्रोटीन ईगव्ह टेक्नॉलॉजीस यांच्या समवेत करारनामा करणे व त्याअनुषंगाने इतर कामे मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांनी केलेली आहेत.

प्रशासकीय कारणास्तव प्रोटीन ईगव्ह टेक्नॉलॉजीस, मुंबई (NSDL) यांच्याकडे महानगरपालिकेची डी.टी.ए म्हणून मा.आयुक्त महोदय, डी.टी.ओ. म्हणून मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी व डी.डी.ओ. म्हणून मा.उपायुक्त (मुख्यालय) यांची नोंदणी करणे ही कामे बाकी आहेत. तसेच काही कर्मचाऱ्यांच्या नेमणूका या माहे दोन तीन महिन्यापुर्वी केल्या असल्याने त्या कर्मचाऱ्यांचे सभासद नोंदणीसाठी कादगपत्रे/दस्तऐवज तपासणे, फॉर्म ऑफलाईन भरणे, कर्मचाऱ्यांचा ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी डाटा संगणक मध्ये भरण्याचे काम चालू आहे. सदर कामाची मुदत दि.08/11/2023 पर्यंत आहे. वरीलप्रमाणे कामे पूर्ण होण्यासाठी अंदाजे 06 महिने लागण्याची शक्यता आहे. सदरचे काम दरमहा रु.87,182/- प्रमाणे 11 महिन्यांसाठी एकूण रु.9,59,000/- या दराने मंजूर करण्यात आले आहे.

मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांनी (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता उपरोक्त प्रमाणे बरीच कामे बाकी असल्याचे तसेच मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांनी सदरचे काम मंजूर दरात कोणतीही भाव वाढ न घेता दरमहा रु.87,182/- प्रमाणे करण्यास तयार असून तरी सदरच्या कामास यापुढे 06 महिन्याची मुदतवाढ देणेबाबत दि.25/10/2023 रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांना दि.09/12/2022 रोजी 11 महिन्याकरीता (दि.09/12/2022 ते दि.08/11/2023) कार्यादेश देण्यात आलेला आहे. तसेच प्रशासकीय ठराव क्र.162 दि.19/12/2022 अन्वये होणाऱ्या रु.9,59,000/- इतक्या खर्चास आर्थिक मान्यता दिलेली आहे.

मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांची दि.08/11/2023 रोजी मुदत संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता उपरोक्तप्रमाणे बरीच कामे प्रलंबित असल्याने खाजगी सल्लागार मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांची आवश्यक आहे. त्यामुळे मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांना दि.08/11/2023 ते दि.30/04/2024 रोजीपर्यंत मुदतवाढ देण्याबाबत मा. आयुक्त महोदय यांनी दि.14/03/2024 मान्यता दिलेली असल्याने मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांना दि.15/03/2024 रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सबब मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांच्या दि.08/11/2023 ते दि.30/04/2024 रोजीपर्यंत दरमहा रु.87,182/- याप्रमाणे होणाऱ्या रु.5,23,092/- (अक्षरी रु. पाच लाख तेवीस हजार ब्याण्णव मात्र) इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(संजय दोंदे)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 23/04/2024 / 3=30 वा.
रजिस्टर नं. अ. क्र. 964 दि. 2024/24
लिपीक
लिपीक 23/4/24
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

दि.१९/ ९ /2024

प्रकरण क्र. ९७४ :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांना मुदतवाढ देणेबाबत.

कार्यालयीन प्रस्ताव

महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू करण्याचे काम सुरु केले असून आतापर्यंत 565 कर्मचाऱ्यांचे सभासद नोंदणीसाठी कादगपत्रे/दस्तऐवज तपासणे, फॉर्म ऑफलाईन भरणे व त्यापैकी 530 कर्मचाऱ्यांना ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी डाटा संगणकामध्ये भरणे, पी.एफ.आर.डी.ए, दिल्ली यांची मान्यता घेणे, प्रोटीन ईगव्ह टेक्नॉलॉजीस यांच्या समवेत करारनामा करणे व त्याअनुषंगाने इतर कामे मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांनी केलेली आहेत.

प्रशासकीय कारणास्तव प्रोटीन ईगव्ह टेक्नॉलॉजीस, मुंबई (NSDL) यांच्याकडे महानगरपालिकेची डी.टी.ए म्हणून मा.आयुक्त महोदय, डी.टी.ओ. म्हणून मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी व डी.डी.ओ. म्हणून मा.उपायुक्त (मुख्यालय) यांची नोंदणी करणे ही कामे बाकी आहेत. तसेच काही कर्मचाऱ्यांच्या नेमणूका या माहे दोन तीन महिन्यापुर्वी केल्या असल्याने त्या कर्मचाऱ्यांचे सभासद नोंदणीसाठी कादगपत्रे/दस्तऐवज तपासणे, फॉर्म ऑफलाईन भरणे, कर्मचाऱ्यांचा ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी डाटा संगणक मध्ये भरण्याचे काम चालू आहे. सदर कामाची मुदत दि.08/11/2023 पर्यंत आहे. वरीलप्रमाणे कामे पूर्ण होण्यासाठी अंदाजे 06 महिने लागण्याची शक्यता आहे. सदरचे काम दरमहा रु.87,182/- प्रमाणे 11 महिन्यांसाठी एकूण रु.9,59,000/- या दराने मंजूर करण्यात आले आहे.

मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांनी (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता उपरोक्त प्रमाणे बरीच कामे बाकी असल्याचे तसेच मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांनी सदरचे काम मंजूर दरात कोणतीही भाव वाढ न घेता दरमहा रु.87,182/- प्रमाणे करण्यास तयार असून तरी सदरच्या कामास यापुढे 06 महिन्याची मुदतवाढ देणेबाबत दि.25/10/2023 रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांना दि.09/12/2022 रोजी 11 महिन्याकरीता (दि.09/12/2022 ते दि.08/11/2023) कार्यादेश देण्यात आलेला आहे. तसेच प्रशासकीय ठराव क्र.162 दि.19/12/2022 अन्वये होणाऱ्या रु.9,59,000/- इतक्या खर्चास आर्थिक मान्यता दिलेली आहे.

मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांची दि.08/11/2023 रोजी मुदत संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता उपरोक्तप्रमाणे बरीच कामे प्रलंबित असल्याने खाजगी सल्लागार मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांची आवश्यक आहे. त्यामुळे मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांना दि.08/11/2023 ते दि.30/04/2024 रोजीपर्यंत मुदतवाढ देण्याबाबत मा. आयुक्त महोदय यांनी दि.14/03/2024 मान्यता दिलेली असल्याने मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांना दि.15/03/2024 रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सबब मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांच्या दि.08/11/2023 ते दि.30/04/2024 रोजीपर्यंत दरमहा रु.87,182/- याप्रमाणे होणाऱ्या रु.5,23,092/- (अक्षरी रु. पाच लाख तेवीस हजार ब्याण्णव मात्र) इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळावी असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. ७७४ दिनांक १९/ ९ /2024

मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता खाजगी सल्लागार मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "महानगरपालिकेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे (DCPS) सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू करणेकरीता उपरोक्तप्रमाणे बरीच कामे प्रलंबित असल्याने खाजगी सल्लागार मे.एस.जी.एंटरप्राईजेस (श्री.सुरेश केशव घोलप) यांच्या दि.08/11/2023 ते दि.30/04/2024 रोजीपर्यंत दरमहा रु.87,182/- याप्रमाणे होणाऱ्या रु.5,23,092/- (अक्षरी रु.पाच लाख तेवीस हजार ब्याण्णव मात्र) इतक्या खर्चास प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(संजय काटकर, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मध्यवर्ती भांडार विभाग

// गोषवारा //

दि. १९/९/२०२४

प्रकरण क्र.१७५ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेकामी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेऊन Online E-Tendering व्दारे तसेच वृत्तपत्रात जाहीर फेर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेली होती. त्याकरिता पात्र असलेले निविदाधारक मे. केंद्रीय भांडार, मे. आर.के. इंटरप्रायजेस व मे. शिवम बुक मॅनिफॅक्चरिंग कंपनी यांनी सादर केलेले दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने निविदेतील दरास मा.आयुक्त सो. दि.02/09/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेकामी अंदाजित रु. 1,20,00,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73 (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. तरी रु. 1,20,00,000/- इतक्या होणा-या खर्चास मा. प्रशासक यांची मंजुरी मिळणेस विनंती आहे.

(संजय दोंदे)
उप-आयुक्त (मु.) (मध्यवर्ती भांडार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मध्यवर्ती भांडार विभाग

प्रशासकीय ठराव दि.१९/ ९ /2024

प्रकरण क्र.१७५ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणेबाबत.

ठराव क्र. १७५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणे कामाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या 1 (अ) व 1 (ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14, दि. 26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता विविध प्रकारची स्टेशनरी खरेदी करणे." याकामी निविदाधारक मे. केंद्रीय भांडार, मे. आर.के. इंटरप्रायजेस व मे. शिवम बुक मॅनिफॅक्चरिंग कंपनी यांच्यामार्फत स्टेशनरी पुरवठा करण्यात येणा-या रु. 1,20,00,000/- च्या मर्यादेत खर्चास मान्यता देत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहीत पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

// गोषवारा //

दि१९/९/2024

प्रकरण क्र.:- (१७६) मा.आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामांचे अवलोकन करणे.

अ. क्र	कामाचे नाव	अंदाजित खर्च (जी.एस.टी. वगळुन)	ठेकेदाराचे नाव	मंजूर दर
1	2	3	4	5
1.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र.20 मधील सेक्टर नं.06 येथील फुटपाथ येथे स्थापत्य कामे करणे (आमदार निधी)	रु.21,12,764/-	**मे.जे.एस. इन्फ्रा.,** मे. दुर्गेश कंस्ट्रक्शन, मे. विकास इंटरप्रायझेस मे. कमल कंस्ट्रक्शन,	**12.0000 % कमी दराने** 0.1000 % कमी दराने 3.5700 % जास्त दराने 5.0500 % जास्त दराने

वरील निविदेच्या दरास मा.आयुक्त यांनी जी.एस.टी. सह मंजुरी दिली आहे. सदर कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC8/23-24/DK/PG-24

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक १९ ९ /2024

विषय क्र. (१७६) :- मा.आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामांचे अवलोकन करणे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजित खर्च (जी.एस.टी. वगळुन)	ठेकेदाराचे नाव	मंजूर दर
1	2	3	4	5
1.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र.20 मधील सेक्टर नं.06 येथील फुटपाथ येथे स्थापत्य कामे करणे (आमदार निधी)	रु.21,12,764/-	**मे.जे.एस. इन्फ्रा.,** मे. दुर्गेश कंस्ट्रक्शन, मे. विकास इंटरप्रायझेस मे. कमल कंस्ट्रक्शन,	**12.0000 % कमी दराने** 0.1000 % कमी दराने 3.5700 % जास्त दराने 5.0500 % जास्त दराने

कार्यालयीन प्रस्तावना

वरील **मे.जे.एस. इन्फ्रा.,** या निविदा धारकांनी निविदा सादर केली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील 01 कामांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (ड) नुसार प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. १७६ दिनांक १९/९/2024

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 01 कामाच्या निविदेस मान्यता देण्याच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) / नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास

अनुसरुन खालील कामाच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र	कामाचे नाव	अंदाजित खर्च (जी.एस.टी. वगळुन)	ठेकेदाराचे नाव	मंजूर दर
1	2	3	4	5
1.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र.20 मधील सेक्टर नं.06 येथील फुटपाथ येथे स्थापत्य कामे करणे (आमदार निधी)	रु.21,12,764/-	**मे.जे.एस. इन्फ्रा.,** मे. दुर्गेश कंस्ट्रक्शन, मे. विकास इंटरप्रायझेस मे. कमल कंस्ट्रक्शन,	**12.0000 % कमी दराने** 0.1000 % कमी दराने 3.5700 % जास्त दराने 5.0500 % जास्त दराने

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-8/23-24/DK/ST-24

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

दि.१९/ ९ /2024

// गोषवारा //

प्रकरण क्र. (१७७) :- निविदेस मान्यता देणेबाबत.

अ. क्र	टेंडर आय डी	कामाचे नाव	अंदाजित खर्च	निविदाधारकाचे नाव	सादर केलेला दर
1	2	3	4	5	6
1.	1049636_1	1)भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे स्ट्रीट लाईट लावणे. 2) भाईंदर (प.) गांधी नगर येथे अंतर्गत सी.सी. रस्ता तयार करणे. 3) भाईंदर (प.) गांधी नगर येथे अंतर्गत गटार रस्ता तयार करणे. 4) मिरारोड (पुर्व) पेणकरपाडा येथील गटारावरील स्टॅम्प कॉक्रीट करणे. 5) भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील अंतर्गत गटार तयार करणे. 6) मिरारोड (पुर्व) पेणकर पाडा येथे अंतर्गत रस्ते तयार करणे. 7) गांधीनगर येथे फुटपाथ वरती स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. (भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना)	रु.3,36,96,528/-	**मे. शंकेश्वर इंटरप्रायझेस** मे. लॅण्डमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि., मे. वरुण कंस्ट्रक्शन, मे. एस.के. डेव्हलोपर्स,	**12.0700% कमी दराने** 10.9900% कमी दराने 10.0800% कमी दराने 0.0100% कमी दराने

वरील कामी मे. शंकेश्वर इंटरप्रायझेस या निविदाधारकाने अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा सादर केल्या आहेत. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील कामांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक १९ सप्टेंबर 2024

१७७

विषय क्र. ( ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

निविदेस मान्यता देणेबाबत.

अ. क्र	टेंडर आय डी	कामाचे नाव	अंदाजित खर्च	निविदाधारकाचे नाव	सादर केलेला दर
1	2	3	4	5	6
1.	1049636_1	1)भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे स्ट्रीट लाईट लावणे. 2) भाईंदर (प.) गांधी नगर येथे अंतर्गत सी.सी. रस्ता तयार करणे. 3) भाईंदर (प.) गांधी नगर येथे अंतर्गत गटार रस्ता तयार करणे. 4) मिरारोड (पुर्व) पेणकरपाडा येथील गटारावरील स्टॅम्प कॉक्रीट करणे. 5) भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील अंतर्गत गटार तयार करणे. 6) मिरारोड (पुर्व) पेणकर पाडा येथे अंतर्गत रस्ते तयार करणे. 7) गांधीनगर येथे फुटपाथ वरती स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. (भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना)	रु.3,36,96,528/-	**मे. शंकेश्वर इंटरप्रायझेस** मे. लॅण्डमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि., मे. वरुण कंस्ट्रक्शन, मे. एस.के. डेव्हलोपर्स,	**12.0700% कमी दराने** 10.9900% कमी दराने 10.0800% कमी दराने 0.0100% कमी दराने

कार्यालयीन प्रस्तावना

वरील कामी मे. शंकेश्वर इंटरप्रायझेस या निविदाधारकाने अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा सादर केली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील 01 कामांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. 960 दिनांक 9 ए 2024

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वरील 01 कामांस मान्यता देण्याच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन खालील कामाच्या मे. शंकेश्वर इंटरप्रायझेस निविदाधारकाने सादर केलेल्य अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र	टेंडर आय डी	कामाचे नाव	अंदाजित खर्च	निविदाधारकाचे नाव	सादर केलेला दर
1	2	3	4	5	6
1.	1049636_1	1)भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे स्ट्रीट लाईट लावणे. 2) भाईंदर (प.) गांधी नगर येथे अंतर्गत सी.सी. रस्ता तयार करणे. 3) भाईंदर (प.) गांधी नगर येथे अंतर्गत गटार रस्ता तयार करणे. 4) मिरारोड (पुर्व) पेणकरपाडा येथील गटारावरील स्टॅम्प कॉक्रीट करणे. 5) भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील अंतर्गत गटार तयार करणे. 6) मिरारोड (पुर्व) पेणकर पाडा येथे अंतर्गत रस्ते तयार करणे. 7) गांधीनगर येथे फुटपाथ वरती स्टॅम्प कॉक्रीटीकरण करणे. (भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना)	रु.3,36,96,528/-	**मे. शंकेश्वर इंटरप्रायझेस** मे. लॅण्डमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि., मे. वरुण कंस्ट्रक्शन, मे. एस.के. डेव्हलोपर्स,	**12.0700% कमी दराने** 10.9900% कमी दराने 10.0800% कमी दराने 0.0100% कमी दराने

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

प्रशासकीय सभा दि. १९/०९/२०२४

// गोषवारा //

प्रकरण क्र. :-१७८ मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या **"माझी वसुंधरा अभियान ३.०"** मध्ये अमृत गटामध्ये राज्यस्तरावर मिरा भाईंदर महानगरपालिकेला ३ लक्ष ते १० लक्ष लोकसंख्या गटामध्ये प्रथम क्रमांक व बक्षिस रक्कम रु.७.०० कोटी व भुमी थीमॅटीकमधील उच्चत्तम कामगिरी केल्याबद्दल प्रथम क्रमांक व बक्षिस रक्कम रु.२.०० कोटी असे एकुण रु.९.०० कोटीचे बक्षिस संदर्भ क्र. ०१ च्या शासन निर्णयान्वये जाहीर झाले आहे. त्यानुसार रु.९.०० कोटी बक्षीस रक्कमेचा प्रकल्प अहवाल तयार करुन प्रशासकीय ठराव क्र. २७० दि.२९/११/२०२३ च्या मान्यतेने दि.०१/१२/२०२३ रोजी मा.प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांना सदर प्रकल्प अहवाल मान्यतेकरीता शासनाकडे पाठविण्यात आलेला होता.

परंतु शासन निर्णय क्रमांक : मावअ-२०२४/प्र.क्र.१८(१)/तां.क.१ दि.२३/०२/२०२४ अन्वये माझी वसुंधरा DPR मधील काही कामांना शासन निर्णयान्वये सादर केलेल्या रु.९.०० कोटी प्रकल्प अहवालामध्ये हिरवळीचे गवत (लॉन) लागवडीची कामे व जुन्या हरीत क्षेत्रांच्या देखभालींची कामे असे एकुण रु.५,१८,७८,८८५/- किंमतीची कामे वगळुन (वस्तु व सेवा करासह) उर्वरीत रु.३,८८,७२,३१०/- किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच प्रशासकीय मान्यता न दिलेल्या रु.५,१८,७८,८८५/- रक्कमेचा विनियोग मिरा भाईंदर महानगरपालिका शहारातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी करावा. स्थानिक / देशी प्रजातीचे वृक्ष व बांबू लागवडीचा समावेश असलेला सुधारीत प्रकल्प अहवाल तयार करुन महानगरपालिकेचे शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेवुन तो प्रशासकीय मान्यतेसाठी पुन्हा शासनास सादर करावा. असा शासन निर्णय पारीत झालेला आहे.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील हरीत क्षेत्र वाढविण्यासाठी वृक्षारोपण व बांबुची लागवड करणे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास दि.१०/०९/२०२४ रोजी मा. शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम
१	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांत उद्याने, मैदाने, स्मशानभुमी व शासकीय इमारती येथे वृक्षारोपण करणे. (Without Tree Guard) (५००० नग) (ट्रि गार्ड ची आवश्यकता नाही)	रु.१,२०,९३,३७५/-
२	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन ०२ वर्ष निगा देखभाल करणे. (With Tree Guard) (३००० नग) (ट्रि गार्ड ची आवश्यकता आहे)	रु.२,९१,९८,१६९/-
३	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांबुची लागवड करुन ०६ महिने निगा देखभाल करणे. (६६१७ नग)	रु.१,०५,८७,२००/-
	एकुण	**रु.५,१८,७८,७४४/-**

सबब "माझी वसुधंरा" अभियान ३.० अंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या बक्षिस रक्कमेपैकी रु.५,१८,७८,७४४/- रक्कमेचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मंजुरीकरीता मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठविण्या करीता मा.प्रशासक यांच्या मान्यतेकरीता नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करण्यास मा. आयुक्त सो. यांनी दि.१३/०९/२०२४ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत मा. प्रशासक यांची मान्यता मिळणेस शिफारस असे.

(कल्पिता पिंपळे)
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. १६/०९/२०२४ वेळ दु. १=30 मि.
नोंदणी क्र. अ. क्र. १८१ वर्ष २०२४/२५
लिपीक
सचिव विभाग
१६/०९/२४
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

उदयान विभाग

प्रशासकीय ठराव दि.१९/०९/२०२४ रोजी

प्रकरण क्र.१५८ मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत.

कार्यालयीन प्रस्तावना

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या **"माझी वसुंधरा अभियान ३.०"** मध्ये अमृत गटामध्ये राज्यस्तरावर मिरा भाईंदर महानगरपालिकेला ३ लक्ष ते १० लक्ष लोकसंख्या गटामध्ये प्रथम क्रमांक व बक्षिस रक्कम रु.७.०० कोटी व भुमी थीमॅटीकमधील उच्चत्तम कामगिरी केल्याबद्दल प्रथम क्रमांक व बक्षिस रक्कम रु.२.०० कोटी असे एकुण रु.९.०० कोटीचे बक्षिस संदर्भ क्र. ०१ च्या शासन निर्णयान्वये जाहीर झाले आहे. त्यानुसार रु.९.०० कोटी बक्षीस रक्कमेचा प्रकल्प अहवाल तयार करुन प्रशासकीय ठराव क्र. २७० दि.२९/११/२०२३ च्या मान्यतेने दि.०१/१२/२०२३ रोजी मा.प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांना सदर प्रकल्प अहवाल मान्यतेकरीता शासनाकडे पाठविण्यात आलेला होता.

परंतु शासन निर्णय क्रमांक : मावअ-२०२४/प्र.क्र.१८(१)/तां.क.१ दि.२३/०२/२०२४ अन्वये माझी वसुंधरा DPR मधील काही कामांना शासन निर्णयान्वये सादर केलेल्या रु.९.०० कोटी प्रकल्प अहवालामध्ये हिरवळीचे गवत (लॉन) लागवडीची कामे व जुन्या हरीत क्षेत्रांच्या देखभालींची कामे असे एकुण रु.५,१८,७८,८८५/- किंमतीची कामे वगळुन (वस्तु व सेवा करासह) उर्वरीत रु.३,८८,७२,३१०/- किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच प्रशासकीय मान्यता न दिलेल्या रु.५,१८,७८,८८५/- रक्कमेचा विनियोग मिरा भाईंदर महानगरपालिका शहारातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी करावा. स्थानिक / देशी प्रजातीचे वृक्ष व बांबू लागवडीचा समावेश असलेला सुधारीत प्रकल्प अहवाल तयार करुन महानगरपालिकेचे शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेवुन तो प्रशासकीय मान्यतेसाठी पुन्हा शासनास सादर करावा. असा शासन निर्णय पारीत झालेला आहे.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील हरीत क्षेत्र वाढविण्यासाठी वृक्षारोपण व बांबुची लागवड करणे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास दि.१०/०९/२०२४ रोजी मा. शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम
१	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उद्याने, मैदाने, स्मशानभुमी व शासकीय इमारती येथे वृक्षारोपण करणे. (Without Tree Guard) (५००० नग) (ट्रि गार्ड ची आवश्यकता नाही)	रु.१,२०,९३,३७५/-
२	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करुन ०२ वर्ष निगा देखभाल करणे. (With Tree Guard) (३००० नग) (ट्रि गार्ड ची आवश्यकता आहे)	रु.२,९१,९८,१६९/-
३	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांबुची लागवड करुन ०६ महिने निगा देखभाल करणे. (६६१७ नग)	रु.१,०५,८७,२००/-
	एकुण	**रु.५,१८,७८,७४४/-**

सबब "माझी वसुधंरा" अभियान ३.० अंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या बक्षिस रक्कमेपैकी रु.५,१८,७८,७४४/- रक्कमेचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मंजुरीकरीता मा. सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठविण्या करीता मा.प्रशासक यांच्या मान्यतेकरीता नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करण्यास मा. आयुक्त सो. यांनी दि.१३/०९/२०२४ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत मा.प्रशासक यांची मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. ५७८ दि. १९/०९/२०२४

मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेमधुन घ्यावयाच्या कामांसाठीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविणेबाबत प्रशासक यांची मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

(संजय श्रीपतराव काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

// पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

// गोषवारा //

दि. १९/९/२०२४

प्रकरण क्र (१७९) :- केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियांनांतर्गत Reforms Incentive घटकांतर्गत प्राप्त होणारा निधी अंतर्गत दोन कामांचा व मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे दैनंदिन, परिचलन, देखभाल दुरुस्ती व पाणी परिक्षण करणे कामी SCADA प्रणाली व Automation करणे या कामांचा **सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी महानगरपालिकेने तयार केलेल्या नामिकासुची (Empanelment List) मधील सल्लागाराची नियुक्ती करणेबाबत..**

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियांनांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण प्रकल्पांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी पहिल्या (पाणी पुरवठा) टप्यासाठी रु.१० कोटी व दुसऱ्या (मलनि:सारण) टप्यासाठी रु.१० कोटी असा एकूण दोन्ही टप्यासाठीचा रु.२० कोटीचा प्रोत्साहन निधी (Reforms Incentive) मंजूर करण्यात आला आहे. सदर मंजूर निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. सदरचा निधी हा केंद्र शासनाच्या मंजुरी आदेशात नमूद व अटीशर्तीच्या अधिन राहून खर्च करण्याबाबत अवगत केलेले आहे.

त्यानुसार केंद्र शासनाच्या Ministry of Housing & Urban Affairs AMRUT Division यांनी सदरचा निधी हा फक्त खालील कामांसाठीच खर्च करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

१. Property Tax Mapping through Drone based survey / other latest technologies.
२. Drainage Planning & Water Conservation measures including urban flood prevention
३. Reduction in Non-Revenue Water Conservation measures including urban flood prevention.
४. Mechanised Sewage /Septage cleaning.
५. Drinking water outlet in public areas.

उपरोक्त पैकी अ.क्र. २ व ४ ची कामे करणेसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेस मा. आयुक्त सो यांची मंजूरी प्राप्त आहे.

तसेच विषयांकीत क्र.०२ च्या कामासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सद्यस्थित दररोजचा सुमारे २०० द.ल.ली. पाणी होत आहे. त्यासाठीचा जलकुंभापर्यंतच्या सुमारे २३ कि.मी. लांबीच्या मुख्य जलवाहिन्या , ३३ उंच जलकुंभ, ८ पपिंग स्टेशन व ३९१ कि.मी. लांबीची वितरण व्यवस्था कार्यान्वीत आहे. सद्यस्थित दैनंदिन देखभाल दुरुस्ती व परिचलनाची कामे महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी आस्थापनेवरील कर्मचारी वर्गाकडून (In-house) करण्यात येतो. भविष्यातील २०४६ पर्यंतची शहराची पाण्याची मागणी पुर्ण होण्यासाठी अमृत २.० अभियानांतर्गत सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था बळकटीकरण / विस्तारीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.

या योजने अंतर्गत सुमारे ४१ कि.मी. लांबीच्या मुख्य जलवाहिन्या, २५ नवीन जलकुंभ / भुमिगत पाण्याची टाकी (संप), १७६ कि.मी. लांबीची वितरण व्यवस्था अंथरणे तसेच पाणी पुरवठा वितरण व्यवस्थे अंतर्गत येणारे अस्तित्वातील तसेच प्रस्तावीत सर्व जलकुंभांच्या ठिकाणी SCADA प्रणाली राबविणे तसेच ८ पपिंग स्टेशनच्या ठिकाणी Automation करणे, तसेच सर्व जलकुंभांच्या ठिकाणी जलमापक यंत्र बसविणे इत्यादी कामांचा अंतर्भाव आहे. या कामासाठी आवश्यक

असणारा निधी हा शासनाच्या इतर योजनेमधून प्राप्त करून घेण्यात येईल. सदर कामासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी उपरोक्त दोन्ही कामांसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकामी सद्यस्थित प्रगतीपथावर असलेल्या अमृत २.० अभियानांतर्गत योजनेसाठी नियुक्त करण्यात आलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. फोरस्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, या कंपनीसच नियुक्त करणे उचित राहील. कारण सदर कंपनीस प्रगतीपथावर असलेल्या निविदेमध्ये SCADA व Automation च्या कामाचा आवाका माहित आहे. तसेच सदर कंपनी ही महानगरपालिकेच्या नामिका सुचीमध्ये नोंदणीकृत आहे.

तरी उपरोक्त दोन्ही कामांसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी मे. फोरस्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, या कंपनीस सल्लागार म्हणून नेमण्यासाठी मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

उपरोक्त दोन्ही कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. फोरस्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, या कंपनीस सल्लागारांची नामिका सुची (Empanelment List) मधील नमुद दराने अदा करावायाच्या शुल्काचा अंर्तभाव शासनाकडून मंजूर होणाऱ्या निधीमधूनच करण्यात येणार आहे. तरी, उपरोक्त दोन्ही कामांसाठी प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा भाईंदर महानगरपालिका

// पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

प्रशासकीय ठराव दिनांक १९/ ९ /२०२४

विषय क्र. (१७९) :- केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियांनांतर्गत Reforms Incentive घटकांतर्गत प्राप्त होणारा निधी अंतर्गत दोन कामांचा व मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे दैनंदिन, परिचलन, देखभाल दुरुस्ती व पाणी परिक्षण करणे कामी SCADA प्रणाली व Automation करणे या कामांचा **सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी महानगरपालिकेने तयार केलेल्या नामिकासुची (Empanelment List) मधील सल्लागाराची नियुक्ती करणेबाबत..**

ठराव क्र. (१७९) :-

कार्यलयीन प्रस्तावना

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियांनांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण प्रकल्पांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी पहिल्या (पाणी पुरवठा) टप्यासाठी रु.१० कोटी व दुसऱ्या (मलनि:सारण) टप्यासाठी रु.१० कोटी असा एकूण दोन्ही टप्यासाठीचा रु.२० कोटीचा प्रोत्साहन निधी (Reforms Incentive) मंजूर करण्यात आला आहे. सदर मंजूर निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. सदरचा निधी हा केंद्र शासनाच्या मंजुरी आदेशात नमूद व अटीशर्तीच्या अधिन राहून खर्च करण्याबाबत अवगत केलेले आहे.

त्यानुसार केंद्र शासनाच्या Ministry of Housing & Urban Affairs AMRUT Division यांनी सदरचा निधी हा फक्त खालील कामांसाठीच खर्च करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

६. Property Tax Mapping through Drone based survey / other latest technologies.
७. Drainage Planning & Water Conservation measures including urban flood prevention
८. Reduction in Non-Revenue Water Conservation measures including urban flood prevention.
९. Mechanised Sewage /Septage cleaning.
१०. Drinking water outlet in public areas.

उपरोक्त पैकी अ.क्र. २ व ४ ची कामे करणेसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेस मा. आयुक्त सो यांची मंजूरी प्राप्त आहे.

तसेच विषयांकीत क्र.०२ च्या कामासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सद्यस्थित दररोजचा सुमारे २०० द.ल.ली. पाणी होत आहे. त्यासाठीचा जलकुंभापर्यंतच्या सुमारे २३ कि.मी. लांबीच्या मुख्य जलवाहिन्या , ३३ उंच जलकुंभ, ८ पंपिंग स्टेशन व ३९१ कि.मी. लांबीची वितरण व्यवस्था कार्यान्वीत आहे. सद्यस्थित दैनंदिन देखभाल दुरुस्ती व परिचलनाची कामे महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी आस्थापनेवरील कर्मचारी वर्गाकडून (In-house) करण्यात येतो. भविष्यातील २०४६ पर्यंतची शहराची पाण्याची मागणी पुर्ण होण्यासाठी अमृत २.० अभियानांतर्गत सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था बळकटीकरण / विस्तारीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.

या योजने अंतर्गत सुमारे ४१ कि.मी. लांबीच्या मुख्य जलवाहिन्या, २५ नवीन जलकुंभ / भुमिगत पाण्याची टाकी (संप), १७६ कि.मी. लांबीची वितरण व्यवस्था अंथरणे तसेच पाणी पुरवठा वितरण व्यवस्थे अंतर्गत येणारे अस्तित्वातील

तसेच प्रस्तावीत सर्व जलकुंभांच्या ठिकाणी SCADA प्रणाली राबविणे तसेच ८ पंपिंग स्टेशनच्या ठिकाणी Automation करणे, तसेच सर्व जलकुंभांच्या ठिकाणी जलमापक यंत्र बसविणे इत्यादी कामांचा अंतर्भाव आहे. या कामासाठी आवश्यक असणारा निधी हा शासनाच्या इतर योजनेमधून प्राप्त करून घेण्यात येईल. सदर कामासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी उपरोक्त दोन्ही कामांसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकामी सद्यस्थित प्रगतीपथावर असलेल्या अमृत २.० अभियानांतर्गत योजनेसाठी नियुक्त करण्यात आलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. फोरस्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, या कंपनीसच नियुक्त करणे उचित राहील. कारण सदर कंपनीस प्रगतीपथावर असलेल्या निविदेमध्ये SCADA व Automation च्या कामाचा आवाका माहित आहे. तसेच सदर कंपनी ही महानगरपालिकेच्या नामिका सुचीमध्ये नोंदणीकृत आहे.

तरी उपरोक्त दोन्ही कामांसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी मे. फोरस्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, या कंपनीस सल्लागार म्हणून नेमण्यासाठी मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

उपरोक्त दोन्ही कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. फोरस्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, या कंपनीस सल्लागारांची नामिका सुची (Empanelment List) मधील नमुद दराने अदा करावायाच्या शुल्काचा अंर्तभाव शासनाकडून मंजूर होणाऱ्या निधीमधूनच करण्यात येणार आहे. तरी, उपरोक्त दोन्ही कामांसाठी प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता मिळणेस शिफारस आहे.

प्रशासकीय ठराव क्र. १७९ दिनांक ३१/१/२०२४.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम ४५२(अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियांनांतर्गत Reforms Incentive घटकांतर्गत प्राप्त होणारा निधी अंतर्गत दोन कामांचा व मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे दैनंदिन, परिचलन, देखभाल दुरुस्ती व पाणी परिक्षण करणे कामी SCADA प्रणाली व Automation करणे या कामांचा **सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी महानगरपालिकेने तयार केलेल्या नामिकासुची (Empanelment List) मधील सल्लागाराची नियुक्ती करणे** करीता मा. आयुक्त यांना वरील कामाकरीता समन्वय साधनेकरीता प्राधिकृत करण्यात येत असून त्यास वरीलप्रमाणे अधिकारांचा वापर करुन या कामी प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामांबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरसेकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर) भाप्रसे
प्रशासक तथा आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रत पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

मिरा-भाईंदर महानगरपालिका

// पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

दि. १९/९/२०२४

// गोषवारा //

प्रकरण क्र (१८०) :- राज्य शासनाच्या नगरविकास विभागामधील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास" योजनेअंतर्गत निधी वितरित करण्यासाठी मान्यता दिलेली विकास कामे करण्यास मान्यता देणेबाबत.

उपरोक्त विषयान्वे मिरा भाईंदर महानगरपालिका जिल्हा ठाणे करीता "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास" अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी जलशुध्दिकरण व निर्जंतुकीकरण करणे या कामाकरीता संदर्भ पत्र क्र.01 अन्वये निधी उपलब्ध होणेकरीता शासनास पत्र दिलेले होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.02 अन्वये रु.83.70 लक्ष निधीस शासनाची प्रशासकिय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	कामांचे नांव	रक्कम रुपये	शासन	मनपा हिस्सा
1.	Providing and Supplying PLC Based, CBR-MMS Integrated Centralized Automatic Bacteriological Treatment Plant with Online Comprehensive Analyzer At Various ESR's in MBMC Area for Treatment of Water.	रु.99.447/- लक्ष	रु.83.700/ लक्ष	रु.6.747/- लक्ष
	एकूण	रु.99.447/- लक्ष	रु.83.700/- लक्ष	रु.6.747/- लक्ष

